International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.11 No.1 Sept-Oct 2023

# निराश्रीतांचा आधार : प्रधानमंत्री आवास योजना

**कांचन माधव गिरी**
संशोधन विद्यार्थी, पीपल्स कॉलेज, नादेड
**Corresponding Author – कांचन माधव गिरी**
**Email:** Kanchangiri3340@gmail.com
**DOI- 10.5281/zenodo.10250269**

**प्रस्तावना :**

मानवाला जिवन जगण्यासाठी अन्न, वस्त्र याप्रमाणेच निवारा ही देखिल एक मुलभूत गरज आहे. प्राचीन काळापासून आजपर्यंत मानवाने आपल्या बुद्धधीच्या जोरावर विविध शोध लावून,आपले जिवन सुलभ करण्याचा प्रयत्न केला आहे.भटकंती करणाऱ्या मानवाला एका ठिकाणी स्थिर होऊन समाज व्यवस्था निर्माण करण्यात निवारा हा एक महत्वपुर्ण घटक होता.गुफा,झोपडी, मातींची घरे, विटांची घरे,काक्रिटच्या इमारती या बदलल्या काळानुसार मानवाने आपल्या राहणीमानात केलेली प्रगती दर्शवितात.

भारताला स्वातंत्र्य मिळून कित्येक वर्षे उलटली असली, तरीसुद्धा आज भारतामध्ये घरांची समस्या ही फार मोठया प्रमाणात दिसुन येते. झपाट्याने वाढणारी लोकसंख्या आणि दारिद्र्यात होणारी वाढ ही भारतातील आर्थिक विकासामध्ये एक अडथळा निर्माण करण्याचे काम करीत आहे. भारतातील सद्यस्थितिला अतिरिक्त असणाऱ्या लोकसंख्येमुळे घरांची समस्या ही एक स्वाभाविक आहे. भारतासारख्या सद्यस्थितिला प्रचंड लोकसंख्या आणि मर्यादित क्षेत्रफळ असणाऱ्या देशात निवारा ही एक सामाजिक व आर्थीक समस्या बनली आहे. घरांची समस्या ही जशी ग्रामीण भागात आहे तशीच शहरी भागांत देखील आहे. दिवसेदिवस सातत्याने वाढणाऱ्या या स्पर्धेच्या जगात वेळ, संपत्ती व संसाधनांची बचत करून यश मिळवण्यात आंतरराष्ट्रीय स्तरापासून ते घरगुती गोष्टींपर्यंत नियोजनाला महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.

आपल्या देशाचा विकास हा जनतेच्या जिवनमानावरून ओळखला जातो. तरीसुद्धा आज स्वातंत्र्याच्या 75 वर्षानंतरही भारताने विज्ञान, अंतराळ, आर्थिक क्षेत्र, उद्योग, आयात-निर्यात या क्षेत्रांमध्ये घवघवित यश मिळविले असले तरीसुध्दा, आजही बहुतांश जनता आपल्या मूलभूत गरजा देखील पूर्ण करण्यात अपयशी ठरले आहे. वाढती महागाई, दारिद्र्य, बेरीजगारी, जागेची टंचाई या अडचणींच्या विळख्यात मानवाची मूलभूत गरज असलेल्या निवाऱ्यांच्या बाबतीत तडजोड करताना दिसून येतो.त्यासाठी सरकारने नियोजनाच्या माध्यमातून विकास साध्य करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच लोककल्याणासाठी कार्यरत लोकशाही स्वरूपातील सरकारने देशातील प्रत्येक नागरिकांना 'समान मानून, त्यांच्या समस्या ओळखून, त्यांना त्यांच्या जिवन जगण्यासाठी उपयुक्त गोष्टींची किमान पुर्तता करण्या-साठी विविध योजना, कार्यक्रम, विविध पोर्टल, संघटना, महामंडळ अशा विविध साधनांद्वारे आर्थीक स्वरूपाची मदत केली जाते. त्यानुरूप जनतेला सोप्या पद्धतीने मुलभूत गरजा पुर्ण करता याव्यात हा त्यामागचा उदेश आहे. बालकल्याण, महिला सुरक्षा, विमा, मुद्रा, विज, कृषी, कामगार, पाणी, स्वच्छता यासारख्या असंख्य समस्यांवर उपाय व मदत म्हणून सरकारच्या माध्यमांतून अनेक योजना राबविल्या जातात. त्यापैकी एक म्हणजे प्रधानमंत्री आवास आहे. लोकांना कमी व्याजदरात घर बांधण्यासाठी आर्थीक, सहाय्य करण्यासाठी ही योजना ग्रामीण तसेच शहरी भागांत देखिल राबविली जाते.

**पार्श्वभूमी :**

अन्न व वस्त्राप्रमाणेच निवारा ही देखील एक महत्वाची मुलभूत गरज म्हणून याकडे पाहिले जाते. लोकसंख्येचा व्याप आणि बेरोजगारीमुळे वाढते दारिद्र्य तसेच जागेची टंचाई, प्रश्नानुरुप निवारा ही एक जटिल समस्या बनत चालल्याचे दिसते.
त्या हेतुने आपण निराश्रीतांचा आधार : प्रधानमंत्री आवास योजना या अध्ययनासाठी आपण प्रधानमंत्री आवास योजनेची पार्श्वभूमी समजवून घेऊयात. संयुक्त राष्ट्र संघानुसार 1987 या वर्षापासून बेघर असणाऱ्या कुटुंबाना घरे उपलब्ध करुन देण्याचे ठरवले होते. त्यामुळे 1987 हे वर्ष आंतरराष्ट्रीय वर्षे म्हणून घोषीत केले आहे. प्रधानमंत्री आवास योजना ही गरिबीतील जीवन जगणाऱ्या लोकांसाठी राबविली जाणारी योजना आहे. या योजनाद्वारे गरिब लोकांसाठी कमी व्याजदरात घर बांधण्यासाठी शासनाव्दारे आर्थीक सहाय्य करते. ही योजना ग्रामीण तसेच शहरी भागामध्ये राबवली जाते.

भारतात स्वातंत्र्यानंतर लगेचच निर्वासितांचा पुर्नवसनेने शासनमान्य सार्वजनिक गृहनिर्माण कार्यक्रमाची सुरुवात झाली. उत्तर भारतातील विविध भागांमध्ये 1960

पर्यंत 5 लाखांपेक्षा ही जास्त कुटुंबाना घरे देण्यात आली होती. या योजनेच्या पाचव्या पंचवार्षीक योजनेच्या शेवटपर्यंत 67 हजार घरे बांधण्यात आली. तसेच 4थ्या पंचवार्षीक योजनेच्या काळानुरुप करण्यात आलेल्या दुसरी पंचवार्षीक योजना हाऊस साईटस् कम बांधकाम सहाय्य योजना देखिल राज्य क्षेत्राकडे हस्तांतरीत करण्यात आली होती.1985 मध्ये तत्कालिन पंतप्रधान राजीव गांधी यांनी इंदिरा आवास योजना लॉन्च केल्यामुळे भारतातील सार्वजनिक गृहनिर्माण कार्यक्रमाला चालना मिळाली होती. ग्रामीण व शहरी भागातील मागासलेल्या, बेघर असणाऱ्या कुटूंबाना आश्रय मिळवून देण्याचा या गृहनिर्माण कार्यक्रमाचा हेतु होता. तसेच गरीबीतील जिवन जगणाऱ्या लोकांसाठी त्यांच्या निवाऱ्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी, बेघर असणाऱ्यांना हक्काचे घर मिळवून देण्याच्या हेतुन भारत सरकारच्या सतत प्रयत्नांचा एक भाग म्हणुन प्रधानमंत्री आवास योजना ही नरेंद्र मोदी यांनी 2015 मध्ये परवडणारी घरे उपलब्ध करुन देण्याच्या हेतुने सुरु केली.

प्रधानमंत्री आवास योजना

**परिचय :**

भारतातील नियोजन काळानुसार विचार करताना असे लक्षात येते केंद्र सरकारने अलीकडील काळामध्ये ग्रामीण तसेच शहरी भागांच्या विकासासाठी वेगवेगळया योजना राबविण्याचे कार्य हाती घेतल्याचे लक्षात येते. त्या योजना पैकी एक म्हणजे प्रधानमंत्री आवास योजना होय. केंद्र सरकारच्या पुरस्कृत योजनांमध्ये एक महत्वपूर्ण योजना म्हणून प्रधानमंत्री आवास योजना ही गणली जाते.या योजनेद्वारे गरिब लोकांना कमी व्याजदरात घर बांधण्यासाठी आर्थिक सहाय्य केले जाते.त्याद्वारे देशातील कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या जनतेला स्वस्त दरामध्ये वित्तिय सहाय्याद्वारे घर उपलब्ध करुन देणारी भारत सरकारची क्रेडिट लिंक सबसिडी योजना आहे. या योजनेची सुरुवात ग्रामीण तसेच शहरी अशा दोन्ही स्तरावर केंद्रसरकारद्वारे 2015 पासुन सुरु झाली. ही एक विकेंद्रीत स्वरूपाची योजना आहे. यात केंद्र स्तरापासून ते स्थानिक स्वराज्य संस्थेपर्यंत सर्व स्तरावरील प्रशासनाचा समावेश आहे. या योजनेद्वारे 31 मार्च 2022 पर्यंत दोन कोटी परवडणारी घरे बांधण्याचे उद्दीष्टे ठेवण्यात आले होते. त्या अन्वये 2022 पर्यंत सर्वांना घरे उपलब्ध होतील. त्यामध्ये प्रामुख्याने दोन घटक आहेत. त्यापैकी शहरी भागातील गरिबांसाठी प्रधानमंत्री आवास योजना PMAY-U आणि ग्रामीण भागातील गरीबांसाठी प्रधानमंत्री आवास योजना PMAY-G अशा घटाकांत आहे.

स्वातंत्र्यानंतर कांग्रेस काळात सुरू करण्यात आलेली इंदिरा आवास योजना ही 1985 ते 1986 मध्ये सुरू करण्यात आली होती. एप्रिल 1989 पासून तिची अंमलबजावणी जवाहर रोजगार योजनेचा एक भाग म्हणुन त्याकडे पाहिले जाते. नंतर भारत सरकारने तिला स्वतंत्र दर्जा दिला. याच इंदिरा आवास योजनेची विकसीत आवृत्ती याच स्वरुपात प्रधानमंत्री आवास योजना ही कार्यरत आहे. नंतर 23 मार्च 2016 रोजी केंद्रीय कॅबिनेटने 2022 पर्यंत सर्वांसाठी घरे या अनुरूप प्रधानमंत्री आवास योजनेला मान्यता दिली.या योजनेची अंमलबजावणी 2016 पासून करण्यात आली. तेंव्हापासून 20 नोव्हेंबर हा दिवस दरवर्षी आवास दिवस म्हणुन साजरा करण्याचा निर्णय घेतला गेला असुन, त्याप्रमाणे दरवर्षी साजरा केला जातो. या योजने अंतर्गत ग्रामीण भागातील बेघर व भुमीहीन लाभार्थ्यांना 1.20 लाख रुपये तर नक्षलग्रस्त व डोंगराळ दुर्गम भागातील लोकांना 1.30 लाख रुपये अशी रक्कम घर बांधण्यासाठी देण्याचे ठरविले. केंद्र शासनाच्या पुरस्कृत अशा महत्वाकांक्षी योजने अंतर्गत ग्रामीण व शहरी भागातील कुटुंबांना सोई-सुविधांसह पक्की घरे उपलब्ध करुन देण्याचे ठरविले आहे.

**योजनेची उदिष्टये :**

सर्वांसाठी परवडणारी घरे उपलब्ध करून देणे हे या योजनेचे महत्वपूर्ण उदिष्टये आहे. त्याचप्रमाणे दुरदर्शी प्रधानमंत्री गृहनिर्माण योजना ही चार महत्वपूर्ण अशा श्रेणींवर लक्ष देते. त्यांचा आढावा पुढीलप्रमाणे :

1. वारसांच्या नेतृत्वाखाली घरे बांधणे
2.क्रेडिट लिंक सबसिडीच्या माध्यमातून दुर्बल घटकांसाठी परवडणारी घरे उपलब्ध करून देणे.
3. खाजगी तसेच सरकारी निधीच्या सहकार्याने परवडणारी घरे उपलब्ध करून देणे.
4. झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन करुन ग्रामीण व शहरी भागात घरे उपलब्ध करणे.

**योजनेचे प्रकार :**

या योजनेचे खालीलप्रमाणे 2 प्रकार आहेत.

1. प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण PMAY-G

प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण हे आर्थिकदृष्ट्या कमकुवत आणि कमी उत्पन्न गटांच्या कुटुंबासाठी आहे.

2. प्रधानमंत्री आवास योजना शहरी PMAY – U

प्रधानमंत्री आवास योजना शहरी या योजनेमध्ये जवळ जवळ 4300 शहरे समाविष्ट आहेत.

**योजनेचे लाभार्थी :**

1. मध्यम उत्पन्न गट 1 : समाजातील ज्या लोकांचे वार्षीक उत्पन्न 6 ते 12 लाखा दरम्यान आहे.
2. मध्यम उत्पन्न गट 2 : समाजातील ज्या लोकांचे वार्षिक उत्पन्न 12 ते 18 लाखा दरम्यान आहे.
3. अल्प उत्पन्न गट : समाजातल्या ज्या लोकांचे उत्पन्न 3 ते 6 लाख दरम्यान आहे.
4. आर्थीक दृष्ट्या दुर्बल गट : समाजातल्या ज्या लोकांचे वार्षिक उत्पन्न 3 लाखांपर्यत आहे.

अशा पद्धतिने प्रधानमंत्री आवास योजनेचे लाभार्थी पात्र ठरतात.

**योजनेची वैशिष्ट्ये :**

1. क्रेडिट लिंक सबसिडी योजना (CLSS) हे या योजनेचे प्रमुख वैशिष्ट्ये आहे. या अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील लोकांना अनुदानित व्याजदरानुसार गृहकर्जाची निवड करता येते.
2. PMAY योजनेतून देशाच्या शहरी भागात सुमारे 2 कोटी परवडणारी घरे उभारण्यात येणार आहेत. त्यात प्रामुख्याने महाराष्ट्र, तमिळनाडू आणि पश्चिम बंगालसह अन्य राज्यांचा समावेश आहे.

3.सध्याच्या काळामध्ये सर्वसामान्य नागरिकांसाठी गृहकर्जाची व्याजदर हा सुमारे 10 टक्के किंवा त्यापेक्षा जास्त आहे, मात्र या योजने अंतर्गत सर्व पात्र लाभार्थ्यांना 6.50 टक्के दराने गृहकर्जे मिळते.

4. PMAY योजनेअंतर्गत 'घर बांधण्यासाठी पर्यायवरण अनुकूल आणि शाश्वत तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल.

5. PMAY या योजनेचे बांधकाम तीन टप्प्यांमध्ये केले जाईल.

6.प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये सुरुवातीच्या टप्प्यांपासून भारतातील सर्व क्षेत्रानुरुप अंमलबजावणी केली जाते.

**सारांश :**

प्रस्तुत शोधनिबंध निराश्रीतांचा आधार प्रधानमंत्री आवास योजना या अन्वये PMAY आवास योजनेवरील अध्यनातून असे लक्षात येते की, भारतासारख्या सथास्थितिला प्रचंड लोकसंख्या आणि मर्यादित क्षेत्रफळाच्या दृष्टीने देशात निवारा ही एक सामाजिक समस्या बनली असल्याचे आपणांस लक्षात येते. त्याची कारणे पाहता वाढती महागाई, दारिद्र्य बेरोजगारी, वाढत्या लोकसंख्येमुळे जागेची टंचाई या सर्व समस्यांच्या विळख्यांत मानवाची मुलभुत गरज असलेल्या निवाऱ्याच्या बाबतीत ती तडजोड करतांना दिसून येते. या सर्व समस्याच्या समधानासाठी सरकारच्या माध्यमातून केंद्र पुरस्कृत महत्वाकांक्षी योजना म्हणजेच प्रधानमंत्री आवास योजना ही गरिब वस्तीतील तसेच कमी व्याजदरांमध्ये आर्थीक सहाय्य घर बांधण्यासाठी पुरविण्याचे कार्य करते. प्रधानमंत्री आवास योजनेमुळे अगदी गरीब, आर्थीक दृष्ट्या अपेक्षित वर्गापर्यंत पोहचविले तर त्यामुळे आपला सामाजिक दर्जा उंचावला जाईल व शाश्वत विकासामध्ये वाढ होईल. तसेच लोककल्याणाचे उद्दीष्टे डोळयांसमोर ठेवून कार्य करणाऱ्या भारत सरकारने देशातील गरीब व अकार्यक्षम जनतेला हक्कांचे घर उपलब्ध करून देऊन, तसेच देशातील निवाऱ्याच्या समस्येचे उच्चाटन करण्यासाठी सरकारने प्रधानमंत्री आवास योजनेची सुरुवात केली.

**संदर्भ :**


1. डॉ. प्रदीप आगलावे, संशोधन पद्धती शास्त्र व तंत्रे, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर, (जुन 2022).
2. C.R. Kothari, Research Methodology, New Age International (P) limited publishers, New Delhi (2004).
3. श्री. महेश राजाराम शिंदे, शासकीय योजना, ज्ञानदिप पब्लीकेशन्स. (2022),
4. भोसले आणि काटे, भारतीय अर्थव्यवस्था, फडके प्रकाशन पुणे.
5. Pinal Borot, Pradhan Mantri Awas Yojana (PMAY). Scheme- An emerging prospect of Affordable Housing in India. (June 2019).
6. Nisar Khan, Pradhan Matri Awas Yojana, An Assessment from Housing Adequancy prespective. (2019).
7. https://www.sarkariyojana.com.pmayg- (2023).
8. https://pmaymis.gov.in
9. https://pmay- Rural.gov.in.
10. https://pmay- Urban.gov.in.